

दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

गणपती बाप्पा मोरया

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १६३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१३ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


### उद्धव ठाकरेंची तोफ पुन्हा गरजणार

## २१ सप्टेंबरला शिवसेनेचा गोरेगावात मेळावा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**आगामी पालिका निवडणुकीच्या तयारी साठी शिवसेना सज्ज झाली आहे. येत्या दि,२१ सप्टेंबर रोजी गोरेगाव पूर्व येथील नेस्को संकुलात शिवसे-नेचा मेळावा होणार आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे प्रमुख मार्गदर्शन यावेळी होणार आहे. सुमारे ३५000 जण मावतील असा मोठा हॉल या मेळाव्यासाठी बुक करण्यात आला आहे.**



यावेळी शक्ति प्रदर्शन करत चलो गोरेगाव असा नारा देत शिवसैनिक या मेळाव्यात सहभागी होतील. मुंबईतील शिवसेना नेते, विभागप्रमुख, शिवसेना उपनेते, विधानसभा संघटक, विधानसभा समन्वयक, उपविभागप्रमुख, शाखाप्रमुख, गटप्रमुख आदी मुंबईचे सुमारे ३० ते ३५ हजार पुरुष व महिला पदाधिकारी यावेळी सहभागी होणार आहे. सदर मेळावा यशस्वी करण्यासाठी शिवसेनेच्या मुंबईतील २२७ शाखां मधून जोरदार तयारी व बैठकांचे सत्र सुरू झालेय.

या मेळाव्याची तयारी करण्यासाठी एक आढावा बैठक काल रात्री गोरेगाव पश्चिम एस.व्ही.रोड येथील शिवसेना शाखेत आयोजित केली होती. यावेळी शिवसेना नेते व माजी मंत्री सुभाष देसाई, खासदार व शिवसेना नेते अरविंद सावंत, माजी मंत्री व विभागप्रमुख ॲड.अनिल परब, शिवसेना विधीमंडळ मुख्य प्रतोद, आमदार, विभागप्रमुख सुनील प्रभू, आमदार व माजी राज्यमंत्री रवींद्र वायकर व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी या सभेची जबाबदारी वाटून देण्यात आली आहे.

या मेळाव्यात आगामी पालिका निवडणुकीची तयारी, शिवसेनेचा दसरा मेळावा, शिवसेनेने सर्व काही देवून सुद्धा आमदारांनी केलेली गद्दारी, शिवसेनेचा न्यायालयात सुरू असलेला लढा, दादरमध्ये शिवसेना व शिंदे गटात झालेला राडा यावर उद्धव ठाकरे हे भाष्य करतील आणि सत्ताधाऱ्यांवर टीकेचे जोरदार आसूड ओढतील, आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भगवा फडकवण्या साठी सज्ज राहा असे आवाहन ते या मेळाव्यात हजारोंच्या संख्येने उपस्थित शिवसैनिकांना करतील असे संकेत मिळत आहे.

## स्कूल बसला आग



**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथे एका स्कूल बसला भीषण आग लागल्याची घटना सोमवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. परंतु सुदैवाने वाहकाच्या सतर्कतेमुळे त्याने गाडीतील तिन्ही विद्यार्थ्यांना प्रसंगावधान राखीत बस मधून खाली उतरवल्याने पुढील दुर्घटना टळली आहे.

सिबीडी बेलापूर येथील पिपल्प ऐज्युकेशन सोसायटीची ही स्कूल बस आहे. आज दुपारी १२ च्या सुमारास खारघर वसाहतीमधील सेक्टर १५ घरकुल सोसायटी ते गुडवील इमारत येथून विद्यार्थ्यांना घेऊन हि बस पुढे जात असताना अचानकपणे बस मधून धूर येऊ लागल्याने बसमध्ये काहीतरी अनर्थ झाल्याचे बसचालकाच्या लक्षात आले व त्याने क्लिनरच्या मदतीने बस बाजूला घेऊन आ-तील विद्यार्थ्यांना प्रथम तातडीने बाहेर काढले व त्यांना सुरक्षित जागी उभे केले त्यानंतर परिसरातील लोकांनी मदतीसाठी धाव घेतली काहींनी त्वरित अग्निशामक दलाला कळवले असताना काही वेळातच त्यांचे पथक घटना स्थळी दाखल होऊन त्यांनी शर्तीचे प्रयत्न करुन त्वरीत आग विझवली. या आगीत काही काळासाठी आगीच्या धुराचा लोळ परिसरात पसरला होता. या घटनेत बसचे मोठे नुकसान झाले आहे. स्कूल बसला आग लागल्याची माहिती मिळताच खारघर पोलिसांचे पथक, वाहतूक शाखेचे पथक व पालकांनी त्या ठिकाणी धाव घेतली. आपली मुले सुखरूप असल्याचे पाहून पालकांनी सुटकेचा निश्वास टाकला होता.

## सिडकोतर्फे ४७५८ सदनिकांसह २४५ वाणिज्यिक गाळे आणि ६ कार्यालये विक्रीची योजना

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिडकोच्या विविध गृहसंकुलांतील उपलब्ध ४,१५८ घरांसोबतच २४५ वाणिज्यिक गाळे आणि रेल्वे स्थानक संकुलांतील ६ कार्यालये (कमर्शियल प्रीमाईसेस) विक्रीच्या योजना सिडको महामंडळातर्फे सादर करण्यात आल्या आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह छोटे व्यापारी व व्यावसायिकांना या योजनांच्या माध्यमातून सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.

महागृहनिर्माण योजने अंतर्गत नवी मुंबईतील द्रोणागिरी, कळंबोली, तळोजा आणि खारघर नोडमधील सिडकोच्या गृहसंकुलांतील ४,१५८ घरे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परवडणाऱ्या दरातील या ४,१५८ घरांपैकी ४०४ घरे ही प्रधानमंत्री आवास योजनेंतर्ग आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आणि उर्वरित ३,७५४ घरे ही सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी नवीन उत्पन्न मर्यादा रू. ६,००,००० तर अनुदानाची रक्कम रू. २,५०,००० निश्चित करण्यात आली आहे. नवी मुंबईतील विकसित नोडमध्ये आणि मोक्याच्या ठिकाणी सदर घरे असले-ली गृहसंकुले वसलेली आहेत. या गृहसंकुलांना रस्ते, रेल्वे आणि सिडकोच्या मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेली आहे. आधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण असणाऱ्या या गृहसंकुलांच्या परिसरात शाळा, महाविद्यालये, रुग्णालये इ. सर्व सामाजिक सुविधाही उपलब्ध आहेत.

या सोबतच सिडकोच्या खारघर, तळोजा, द्रोणागिरी, कळंबोली, खारघर आणि घणस-ोली गृहसंकुलातील एकूण २४५ वाणिज्यिक गाळे विक्रीकरिता उपलब्ध आहेत. तसेच नेरूळ रेल्वे स्थानक संकुल आणि जुईनगर स्थानक संकुल येथील प्रत्येकी ३ याप्रमाणे एकूण ६ कार्यालये (कमर्शिअल प्रीमाईसेस) विक्रीकरिता उपलब्ध आहेत.





या योजनांद्वारे समाजातील सर्व घटकांना सुवर्णसंधी प्राप्त होणार आहे, ज्यामुळे शहराच्या आर्थिक विकासात मदत होण्यासोबतच नवी मुंबईच्या वाणिज्यिक क्षमता वृद्धिंगत होऊन शहराच्या आर्थिक विकासासही हातभार लागणार आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह छोटे व्यापारी व व्यावसायिकांना विकासाचा मार्ग मोकळा होणार आहे. नागरीक, व्यापारी व व्यावसायिकांनी लवकरात लवकर या योजनांचा लाभ घ्यावा व आपले घराचे आणि व्यवसायाचे स्वप्न पूर्ण करावे .../२

## श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका पूजन सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका पूजन सोहळा सोमवारी आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. तसेच या सोहळ्याचे औचित्य साधून दुर्बल घटक पुनर्वसन उपक्रमाअंतर्गत गरीब व गरजू कुटुंबांना पनवेल महानगर पालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते मोफत घरघंटीचे वाटप करण्यात आले.या वेळी वहाळ साई संस्थान



अध्यक्ष रवी पाटील यांच्यासह पदाधिकारी, मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संक्षिप्त...

#### कॉर्पोरेट कंपन्यांच्या फायद्यासाठी तांदूळ निर्यातबंदी

**अहमदनगर । वृत्तसंस्था**

शेतकऱ्यांना शेतीमालाला दोन पैसे मिळायला लागताच यापूर्वीची सरकारे निर्यातबंदी लागू करून शेतीमालाचे भाव पाडायचे. भाजप सरकार असे करणारा नाही, उलट हे सरकार शेतकऱ्यांच्या हातातील बेड्या तोडेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वारंवार जाहीर केले होते. प्रत्यक्षात मात्र कांदा, गहू आणि आता तांदळावर निर्यातबंदी लागू करून केंद्र सरकारने आपल्या कथनी आणि करणीत अंतर असल्याचे सिद्ध केले आहे, असा आरोप भारतीय किसान सभेचे डॉ. अजित नवले यांनी केला आहे. तांदळाचे भाव पाडून कॉर्पोरेट कंपन्यांना नफा कमविता यावा, यासाठीच देशात पुरेसा साठा असूनही केंद्र सरकारने रात्रीतून तांदूळ निर्यातबंदीचा निर्णय घेतला, असा आरोपही डॉ. नवले यांनी केला आहे.

केंद्र सरकारने तुकडा तांदळाच्या निर्यातीवर बंदी लागू केली आहे. बिगर बासमती तांदळाच्या निर्यातीवर २० टक्के निर्यातकर लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे तांदूळ उत्पादक शेतकऱ्यावर अन्याय होणार असल्याने केंद्र सरकारने तांदूळ निर्यातबंदी तातडीने उठवावी. खरीपात भात उत्पादन घटण्याचा अंदाज असून, घाऊक आणि किरकोळ बाजारात तांदळाचे दर वाढले असल्याने व पशुखाद्य आणि इथेनॉल मिश्रणासाठी तांदळाची उपलब्धता घटली असल्याने निर्यातबंदी लागू केल्याचा लटका युक्तिवाद केंद्र सरकारकडून केला जात आहे.


## ऐतिहासिक जंजिराचे दरवाजे उघडले

**दै.रायगड नगरी । मुरुड**

सुप्रसिद्ध ऐतिहासिक जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी १ सप्टेंबर पासून सुरु करण्यात आला आहे. १ जून ते ३१ ऑगस्ट या काळात हा किल्ला पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आला होता. सध्या पर्यटकांची ये-जा अगदी मंदगतीने झालेली पहावयास मिळत आहे. त्यामुळे स्थानिकांना आता पर्यटकांच्या आगमनाची प्रतीक्षा लागली आहे. पर्यटक आले तर त्यांचा व्यवसायही बहरणार आहे.

सध्या मुरुड तालुक्यात दिवसा ऊन तर सायंकाळी चारनंतर हवामान बदलते व रोज पाऊस पडतो. त्यामुळे पर्यटक अल्प प्रमाणात या किल्ल्यास भेट देत आहेत. परंतु किल्ला सुरु झाल्याने स्थानिक बोट मालक व आजूबाजूच्या परिसरात व्यवसाय करणाऱ्यांची दुकाने सुरु झाल्याने स्थानिकांच्या स्वयंरोजगारास सुरुवात झाली आहे.

जंजिरा किल्ला हा स्थानिक राजपुरी जलवाहतूक संस्थांना एक शाश्वत उत्पन्नाचा स्रोत आहे. यामुळे स्थानिकांच्या रोजीरोटीचा



प्रश्नही काही अंशी सोडवला जातो. जंजिऱ्यात जाण्यासाठी राजपुरी व खोरा बंदर येथून प्रवासी जलवाहतुकीची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या किल्ल्यावर पर्यटकांची संख्या कमी असल्याने खोरा बंदरातून होणारी वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे. राजपुरी नवीन जेट्टी येथूनच पर्यटकांची वाहतूक सुरु आहे. लवकरच दिवाळी येणार असून सुट्टीचा हंगाम सुरु होणार आहे. अशावेळी ही गर्दी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

## गौरा गणेशोत्सवामध्ये विसर्जनासाठी रात्री बारा वाजेपर्यंत परवानगी देण्यात यावी : ॲड.प्रथमेश सोमण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गौरा गणेशोत्सवामध्ये विसर्जनासाठी रात्री बारा वाजेपर्यंत परवानगी देण्यात यावी, अशी मागणी पनवेल शिवसेना महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले आहे. रायगड जिल्ह्यात व विशेष करून पनवेलमध्ये गौरा गणपती (साखरचौथ गणपती) साजरा करण्याची विशेष परंपरा आहे. मुख्य गणेशोत्सवातील दहा दिवसांच्या गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर पितृपंधरावड्यातील येणाऱ्या चतु-र्थीला गणपतीची प्रतिष्ठापना करून दुसऱ्या दिवशी विसर्जन करण्याचा प्रघात आहे. ह्या उत्सवाची परंपरा पनवेलमध्ये वर्षानुवर्षे साजरी केली जात आहे. पनवेल मध्ये असा गणे-शोत्सव साजरा करणाऱ्या नोंदणीकृत मंडळांची संख्या ७५ च्या वर असून अनेक नागरिक घराघरातदेखील या गणेशोत्सवाचे पालन करतात.



यावर्षी मंगळवारी (दि. १३) साजरा होत असून बुधवारी (दि. १४) विसर्जन होणार आहे. सामान्यतः या विसर्जन मिरवणुकांना रात्री १० वाजेपर्यंत प्रथेप्रमाणे परवानगी असते, परंतु गेली दोन वर्षे कोविडमुळे ही परंपरा खंडित झाली आहे. मंडळांना उत्सव साजरे करता आले नाहीत. तथापि आता आपले हिंदुत्ववादी व लोकाभिमुख सरकार अस्तित्वात आले आहे म्हणूनच पनवेलच्या या अनोख्या परंपरेत गणेश विसर्जनाची मर्यादा रात्री बारा वाजेपर्यंत वाढवण्यात यावी अशी मागणी पनवेलकर नागरिक गणेश भक्त व शेकडो मंडळाच्या प्रतिनिधीमार्फत मी आपणास करीत आहे. मावळचे संसदरत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनाही ही मागणी केली असून याबाबतीत योग्य तो पाठपुरावा करण्याचे आश्र्वासन त्यांनी दिले आहे. कृपया संबंधित जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्त यांना योग्य ते आदेश पारित करावेत ही विनंती, असे सोमण यांनी निवेदनात नमुद केले आहे.

## लम्पी चर्मरोगावर नियंत्रण, प्रतिबंध व निमुर्लनाकरिता जिल्हाधिकाऱ्यांचे विविध यंत्रणांना निर्देश

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

प्राण्यामधील संक्रमक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ अंतर्गत अधिसूचना प्राप्त झाली आहे. त्यामध्ये प्राण्यांमधील संक्रमक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ (२००९ चा (२७) याची कलमे (६) (७) (११) (१२) व (१३) याद्वारे पूर्ण महाराष्ट्र राज्य नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम ३६ द्वारे राज्य शासनाने प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून या रोगासंदर्भात प्रतिबंध, नियंत्रण व निर्मूलन करण्यासाठी अधिनियमाखालील अधिकारांतर्गत कार्यवाही तात्काळ करणे आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांना प्राण्यांमधील संक्रमक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी जिल्ह्यातील विविध शासकीय यंत्रणांना निर्देश दिले आहेत.

लम्पी चर्मरोगावर (एलएसडी) नियंत्रण प्रतिबंध





किंवा त्याचे निमूर्लन करता येईल आणि गोजातीय प्रजातींची सर्व गुरे व म्हशी यांची ज्या ठिकाणी ते पाळले (ठेवले) जातात त्या ठिकाणापासून नियंत्रित क्षेत्रातील किंवा त्या क्षेत्राबाहेरील अन्य कोणत्याही ठिकाणी ने-आण करण्यास, गोजातीय प्रजातीची बाधित असलेली कोणतीही जिवंत किंवा मृत गुरे व म्हशी गोजातीय प्रजातींच्या कोणत्याही बाधित झालेल्या प्राण्यांच्या संपर्कात आलेली कोणत्याही प्रकारची वैरण, प्राण्यांच्या निवाऱ्यासाठी असलेले गवत किंवा अन्य साहित्य आणि अशा प्राण्यांचे शव, कातडी किंवा अन्य कोणताही भाग किंवा अशा प्राण्यांचे उत्पादन किंवा असे प्राणी, नियंत्रित क्षेत्राच्या बाहेर नेण्यासाठी कोणत्याही व्यक्तीस, गोजातीय प्रजातीच्या गुरे व म्हशींचा कोणताही प्राणी बाजार भरविणे, प्राण्यांच्या शर्यती लावणे, प्राण्यांची जत्रा भरविणे, प्राण्यांचे प्रदर्शन आयोजित करणे आणि नियंत्रित क्षेत्रात गोजातीय प्रजातीच्या प्राण्यांचे गट करून किंवा त्यांना एकत्रित करून कोणताही कार्यक्रम पार पाडणे यास, नियंत्रित क्षेत्रामधील बाजारपेठेत, जत्रेत, प्रदर्शनामध्ये किंवा प्राण्यांच्या अन्य जमावामध्ये किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, गोजातीय प्रजाती प्राण्यांच्या बाधित झालेल्या गुरांना व म्हशींना आणणे किंवा आणण्याचा प्रयत्न करणे यास मनाई करण्यात आली आहे.

या मनाई आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यान्वयीन यंत्रणाना पुढीलप्रमाणे जबाबदारी सोपविली आहे. .../२

## वादळी वाऱ्यामुळे मच्छिमारी बंद

**दै.रायगड नगरी । मुरुड**

गेल्या आठवड्यापासून अरबी समुद्रात वादळी वारे वाहत असून समुद्रात लाटांचे तांडव सुरू आहे. ही परिस्थिती कमी जास्त होत असून आठवडाभर मासेमारी बंद राहिली आहे. सोमवारी गुजरात राज्यातील काही नौका मासेमारीस गेल्याचे दिसून आले. मात्र, मुरूड- एकदरा येथील मच्छिमारांनी वादळी वार्याचा आढावा घेऊन पुढील तीन दिवस समुद्रात मासेमारीस न जाण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतची माहिती मुरूड येथील हितेंद्र कुलाबकर, रणजित बळी, नरेंद्र सवाई यांनी दिली.

सोमवारी जवळपास २०० पेक्षा अधिक नौका आगरदांडा-दिघी बंदरात नांगरून उभ्या करण्यात आल्या होत्या. वादळाचा धोका टळला नसल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. तरीही .../२

# पत्रकार संघ व अंकुर फाऊंडेशनच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांसाठी चिपळुण येथील सर्पतज्ञांचे मार्गदर्शन शिबीर

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

सोमवार दि.१२ सप्टेंबर २०२२ स. ११.०० वाजता माणगांव येथिल शिपूरकर शाळेत मा.ता. पत्रकार सेवासंघ व अंकुर फाऊंडेशन संयुक्त विद्यमाने स्तुत्य सर्पमित्र मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले आहे. या कार्यक्रमास शिवसेना नेते (शिंदेगट ) ड. राजिव साबळे यांचे हस्ते उद्घाटन होणार होते परंतु तातडीचे कामानिमीत्त त्यांना मुंबई येथे जावे लागल्याने त्यांनी कार्यक्रमास आवर्जुन शुभेच्छा दिल्या. आयत्या वेळेस या कार्यक्रमाचे अध्यक्षपद रायगड भुषण जेष्ठ पत्रकार, रविंद्र कुवेसकर यांनी भुषविले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कुवेसकर यांनी सापां विषयी गेले पंधरा वर्षाहुन अधिक काळ चिपळुण कुंभार्ली घाट येथे अभ्यासपूर्ण संशोधन करणाऱ्या सदफ कडवेकर व राणी प्रभुलकर या युवा संशोधकांचे कार्याचे उपस्थित विद्यार्थ्या समोर कौतुक केले.

विषारी, निम्न व बिन विषारी सापां विषयी विद्यार्थ्यांनी शांतचित्ताने आलेल्या पाहुण्यांकडुन ज्ञानार्जन करुन सर्वांनी सापांचे रक्षण करुया असे सांगितले. यावेळी चिपळुण कुंभार्ली घाट येथील सह्याद्री संवर्धन व संशोधन संस्थेचे सर्पतज्ञ सदफ कडवेकर व राणी प्रभुलकर यांनी मोठ्या संख्येने उपस्थित विद्यार्थी व शिक्षकवृंदास आपल्या परिसरातील साप शेतकऱ्यांचे कसे मित्र आहेत आणि सापां विषयी जनमाणसात असलेल्या गैरसमजुतीं विषयी, विविध सापांची चित्रफीत पट्टी स्लाईड शोच्या माध्यमातुन सखोल माहीती दिली. आपल्या महाराष्ट्रात ६० प्रकारचे तर जगात जवळपास २८०० जातीचे साप आढळतात या विषयी मुलांना आवडेल अशा शैलीत त्यांनी मार्गदर्शन केले.

सह्याद्रीच्या परिसर आधीवासात आढळणारे तसेच आपल्या ग्रामिण भागातील धनगर, आदिवासी वाड्या, वस्तीत दिसुन येणारे सर्पांविषयी माहीती देताना, साप आपल्याला कसे उपयोगी ठरतात हे सांगितले. या कार्यक्रमाचा मोठ्या कुतुहलाने विद्यार्थ्यांनी आस्वाद घेतला. तसेच आपल्या मनातील सापां विषयीच्या शंकाचे निरसन करुन घेतले. यावेळी अंकुर फाऊंडेशन संस्थेचे सर्व प्रमुख पदाधिकारी तसेच मा.ता. पत्रकार सेवा संघाचे संस्थापक रायगड भूषण अरुण पवार, अध्यक्ष उदय चव्हाण, जेष्ठ पत्रकार अनिल मोकाशी, अधिस्विकृती पत्रकार परेश शिंदे, युवा पत्रकार वैभव सत्वे, सुनिल राजभर, निरंजन कळस, यांची उपस्थिती होती. शिपूरकर शाळेचे शिक्षक शिक्षिका कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे नियोजनबध्द आयोजन केले सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करताना कुंडीतील एक सुंदर फुलांचे रोपटे प्रेमाची भेटवस्तु म्हणुन दिली.

पत्रकार संघ व अंकुर फाऊंडेशन संस्थेने या स्तुत्य मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करुन मुलांना चांगले मार्गदर्शन केल्याने आभार व्यक्त करीत मनापासून धन्यवाद दिले आहेत.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत (भूखंड) कब्जेदार श्री.विजय पांडुरंग भोपी वगैरे यांचे नावे असलेली मिळकत (भूखंड) असून सदरची मिळकत आमचे अशिलांनी विकसनाकरिता घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीचे (भूखंडाचे) हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे...

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

| ठिकाण | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| कामोठे | ३४ | ५ | २५० |

सदर वर नमूद मिळकतीमध्ये (भूखंडामध्ये) अथवा तिच्या कोणत्याही भागावर कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे करार, मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेपट्टा, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास सदर व्यक्तींनी वा संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून सक्षम कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील विहित मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत (भूखंड) निर्वेध असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे (भूखंडाचे) हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरल्या जातील याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१२/०९/२०२२

**सही/-**
**ॲड.प्रदीप तु. भोईर**
**शॉप नं.९, नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**पहिला मजला, आद्य क्रांतीवीर वासुदेव**
**बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.८१०८२८२७००**

मा.गोडसे सो यांचे कोर्टात
प्रो.जमा.६-२५

**अर्जदारांचे वकील**
**ॲड.सचिन केशव शिंदे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१३०२/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/१०/२०२२

१) श्रीमती.सुरेखा संजय सावंत
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कुमार मयुरेश संजय सावंत
वय : २३ वर्षे, धंदा : काहीही नाही
अर्जदार क्र.१ व २ रा.सदनिका क्र.बी/१०१,
विजयदीप सी.एच.एस.लि., सेक्टर नं.६/अे,
प्लॉट नं.१५, महिंद्रा शोरुम मागे, कामोठे,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०९ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी मयत श्री.संजय तुकाराम सावंत हे दि.२९/१०/२०११ रोजी स्टेट बँक कॉलनी, बी ३०/४, सेक्टर १३, नेरुळ, नवी मुंबई ४००७०६, येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०९, येथील सेक्टर ६/अे, प्लॉट क्र.१५ मध्ये बांधण्यात आलेली बिल्डींग ''विजयदीप सी.एच.एस.लि.'' मधील ''बी'' विंग च्या १ ल्या, मजल्यावरील, सदनिका क्र.१०१, क्षेत्र ३९० चौ.मी. ची बांधीव मिळकत.**

मयत श्री.संजय तुकाराम सावंत यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज या मे.न्यायालयात दाखल केला आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मे.न्यायालयात सादर कराव्यात.

जर सदरहू मुदतीत कोणतीही हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून सदरहू मे.न्यायालय अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित झाल्यास त्यांना सदरहू मयत श्री.संजय तुकाराम सावंत यांचे वारस घोषित करून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दि.१२/०९/२०२२ रोजी मे.न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
(कोर्टाचा शिक्का)
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# नांदेड ते मातोश्री पायी प्रवास करणाऱ्या साईरामचे पनवेल मध्ये उत्स्फूर्त स्वागत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसैनिकांनी संघर्षाच्या काळात खचून न जाता एकजुटीने पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी उभे राहण्याचा संदेश घेऊन नांदेड ते मातोश्री (मुंबई) असा प्रवास करणारे शिवसैनिक साईराम कनकुंटवार यांचे पनवेल शाखेत स्वागत करून औक्षण करण्यात आले.



यावेळी त्यांनी सांगितले की माझा पायी प्रवास हा किनवट, जिल्हा नांदेड येथून सुरू झाला. आजचा माझा अठरावा दिवस असून मी रोज अंदाजे पायी चाळीस किलोमीटर चालत आहे, जागो जागी शिवसैनिकांच्या भेटी होत आहेत, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, काही नेते गेले असले तरी शिवसैनिक मात्र त्यांच्या पाठीशी ठाम असल्याचे आत्तापर्यंतच्या प्रवासात दिसून आल्याचे साईराम ने सांगितले. याप्रसंगी रायगड जिल्हासल्लागार शिरीष बुटाला, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, तालुका प्रमुख विश्वास पेटकर, अच्युत मनोरे, प्रविण जाधव,अर्चना कुळकर्णी, सुजन मुसलोंडकर, सचिन पाटील, बापू जोशी, कुणाल कुरघोडे, राकेश टेमघरे, गौतम लोखंडे, आदी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## पनवेल महानगरपालिका
**शहर अभियंता विभाग**
**जाहीर ई-निविदा सुचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/६५२२/प्र.क्र.११२/२३५१/२०२२ दि.१२/०९/२०२२

**शुद्धीपत्रक-१**

| अ.क्र. | निविदा क्र. | निविदा क्र. |
|---|---|---|
| १ | PMC/CE/77/2022-23 | पनवेल महानगरपालिकेने विकसित केलेल्या वडाळे तलाव येथील सुविधा चालविणे त्या मधून उत्पन्न घेणे व त्या बदल्यात तलावाची निगा व देखभाल करणे. |

या कामाच्या ई-निविदेच्या शुद्धीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१३/०९/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**

## कांदळवन झाडांचा ऱ्हास गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे येथील सर्वे नंबर ३६८ व ५६ पनवेल सायन रस्त्याच्या डाव्या बाजूला, कामोठे बस स्थानकाजवळ कांदळवनचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले. त्यावेळी सिडको अधिकारी, तलाठी यांनी या ठिकाणी संयुक्त भेट दिली. या जागेची पाहणी केली असता खाडीमध्ये बांध घातल्याचे दिसून आले. व अंदाजे १०० ते ११० कांदळवन वृक्ष मृत अवस्थेमध्ये आढळून आले. याप्रकरणी मंडळ अधिकारी संतोष कचरे यांनी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञाता विरोधात तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

मे.पांडे सो यांचे कोर्टात

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.शशिकांत द. ढवळे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.९६९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.११/१०/२०२२

श्रीमती.उज्ज्वला प्रताप पाटील
वय : ५८ वर्ष, धंदा : गृहिणी
रा.५३ अ, खालची आळी, दुर्गामाता मंदिराजवळ,
रोहिंजण, पो.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी, विभाग तुर्भे
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची आई कै.जनाबाई बाळाराम पाटील हिचा मृत्यू मौजे : सिद्धीकरवले, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी दि.०१/०७/१९६४ रोजी झालेला असून तिच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत आणि पंचायत समिती पनवेल, पनवेल महानगरपालिका व इतर संबंधित यांच्या कार्यालयात करण्यात आलेली नाही. त्याकारणाने अर्जदार हिने मे.न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. तसेच कै.जनाबाई बाळाराम पाटील हिचा मृत्यूचा दाखला देण्याबाबत ज्या कुणाच्या हरकती असतील त्या हरकती सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत सदर न्यायालयात लेखी कळवाव्यात, तसे न केल्यास सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.१२/९/२०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल**
(कोर्टाचा शिक्का)
**सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

## जाहीर नोटीस

या नोटीसेव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, आमचे अशिल मे. ए आर कंस्ट्रक्शन तर्फे भागिदार श्री रामचंद्र यशवंत मोरजकर पत्ता -शॉप नं-१/२/३ स्वामी समर्थ, भुखंड क्र,ई-१-सी,से-१२ खारघर, हे खालील वर्णनाचा भुखंड चारधाम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित पत्ता : भुखंड नं.७८, सेक्टर-२३, तळोजा फेज -२ तालुका-पनवेल, जिल्हा- रायगड, चारधाम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या सोसायटीच्या नावे भुखंड हस्तातरंण करून देत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा फेज-२ | ७८ | २३ | १६४९.३२ चौ.मी. |

तरी कोणाही व्यक्तीचे / व्यक्ती किवा आर्थिक संस्थेचे भुखंड संदभात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षीस, भाडेपटटा, वारसा, हक्क, लोन किंवा इतर काही असल्यासहि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत कागदपत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे. मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही किंवा हस्तांतरण झाल्यानंतर ही आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.१२/९/२०२२

**सही/-**
**ॲड.सौ.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर,**
**सीबीडी बेलापूर**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सिडकोतर्फे ४१५८ सदनिकांसह २४५ वाणिज्यिक गाळे....

असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे. उपरोक्त योजनांच्या सविस्तर माहितीकरिता https://www.cidco.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले असून अर्ज नोंदणीपासून ते सोडती पर्यंतच्या सर्व प्रक्रिया या पारदर्शक अशा ऑनलाइन प्रक्रियेद्वारे पार पडणार आहेत. योजनांसंबंधी सविस्तर माहिती जाणून घेण्याकरिता अर्जदारांनी या संकेतस्थळास भेट द्यावी.

## जिल्हाधिकाऱ्यांचे विविध यंत्रणांना निर्देश

महसूल विभाग:- जिल्ह्यातील कार्यान्वयीन यंत्रणाच्या मदतीने रोग नियंत्रण करणे, जनावरांचे बाजार, प्राण्यांच्या शर्यती, प्राण्यांची जत्रा भरविणे, प्राण्याचे प्रदर्शन आयोजित करणे, प्राण्यांचे गट करून कार्यक्रम पार पाडणे यास प्रतिबंध करणे.

पोलीस यंत्रणा:- जिल्ह्यातील, जिल्ह्याबाहेरील जनावरांची वाहनातून होणारी वाहतूक प्रतिबंधित करणे, या आदेशाचे पालन न करणाऱ्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करणे. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी:- जिल्ह्यातील, जिल्ह्याबाहेरील जनावरांची वाहनातून होणारी वाहतूक प्रतिबंधित करणे. ग्राम विकास विभाग:- लम्पी (एलएसडी) या रोगाबाबत गावामध्ये जागृती करणे, सतर्कता बाळगणे, गावामध्ये या रोगाबाबत काही माहिती मिळाल्यास नियंत्रण कक्षास कळविणे, गोठ्यामध्ये किटकनाशकांची फवारणी करणे, मृत जनावरांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणे. भूमी अभिलेख विभाग:- रोग प्रादूर्भाव झाल्यास ईपी सेंटर पासून ५ किलोमीटरच्या अंतरातील गावांचा नकाशा तयार करणे.

पशुसंवर्धन विभाग:- लम्पी (एलएसडी) सदृश / बाधित जनावरे आढळल्यास योग्य ते उपचार करणे. विलगीकरण करणे, नमुने गोळा करणे व तात्काळ प्रयोगशाळेत पाठविणे, आजारी प्राण्यांचा दैनंदिन अहवाल तयार करणे, उपचार करणे, नमुने होकारार्थी आल्यास ५ किलोमीटरच्या अंतरातील गावामध्ये लसीकरण करणे.

मुख्य अधिकारी नगरपरिषद (सर्व):- लम्पी (एलएसडी) या रोगाबाबत शहरामध्ये जागृती करणे. सतर्कता बाळगणे, शहरामध्ये या रोगाबाबत काही माहिती मिळाल्यास नियंत्रण कक्षास कळविणे. गोठ्यामध्ये किटकनाशकांची फवारणी करणे, मृत जनावरांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणे. जिल्हा सहनिबंधक, सहकारी संस्था:- कृषी उत्पन्न बाजार समितीत प्राण्यांचे सर्व प्रकारच्या खरेदी-विक्रीचे बाजार भरविण्याबाबत बंदी घालणे. जनावरे खरेदी-विक्रीसाठी एकत्रित न आणणे. संबंधित सर्व यंत्रणांनी निश्चित करण्यात आलेल्या जबाबदारीप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी दिले आहेत.

## वादळी वाऱ्यामुळे मच्छिमारी बंद

काही अतिउत्साही मच्छिमार मासेमारीस जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे धोकादायक आहे. वादळाचा इशारा हवामान खात्याकडून तसेच प्रसिद्ध हवामान तज्ज्ञांकडून देण्यात आला आहे. खोल समुद्रातील वादळ किनाऱ्यावर दिसून येत नाही, असे या मच्छिमारांचे म्हणणे आहे.

सध्या हेटशी वादळी वारे समुद्रात वाहत आहेत. पाऊस, वारे, मोठया उसळत्या लाटा अशी स्थिती असल्याने मच्छिमारांनी धाडस करु नये, असे मत हवामान विभागच्या अधिकार्यांनी व्यक्त केले. तसेच पुढील ३ दिवस वादळाची द्रोणिय स्थिती कायम राहील, असे मत बुजुर्ग मच्छिमारांनी देखील व्यक्त केले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारा कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली जमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसूल दप्तरी नावे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीची आहे. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**गांव : संभे, ता.रोहा, जि.रायगड येथील**

| मालकाचे नाव | ग.नं./स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार | जमीन प्रकार |
|---|---|---|---|---|
| केशव दत्ताराम वेंगुर्लेकर | १७५ | वरकस ०-४१-० पो.ख. ०-०८-० | ०.३३ | भोगवटादार वर्ग-१ |

वरील मिळकतीसंबंधात आम्ही जमीन मालक यांचेबरोबर खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतींवर गहाण, दान, अन्न-वस्त्र बोजा, फरोक्त, बक्षिस, लीन, साठेकरार, अखत्यार, भाडेपट्टा तारण, लिज, ताबा, वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, जप्ती, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क हितसंबंध तसेच एकत्र कुटुंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्हाकेट यांचेकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्यास सदरच्या वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरुन आमच्याकडे जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व मागाहून येणाऱ्या हरकती बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे.
दि.१२/०८/२०२२

**सही/-**
**ॲड.सरिता सुभाष मोरे**
**पत्ता : घर नं.२६५, श्री कुंज,**
**जुनी कॉलनी रोड, पुई-कोलाड,**
**तालुका : रोहा, जिल्हा : रायगड**
**मो.नं.९५९४९९६५६१**

**NEELKANTH VISHWA PHASE-1 CO-OP.HSG SOC.LTD.**
REGD. No.: RGD/PWL/HSG/(TC)/3853/2018-19, Dated 04/07/2018
Survey No.139&140, Usarli-Khurd, Tal.Panvel, Dist.Raigad, Pin-410221

## वार्षिक सर्वसाधरण सभा अधिसूचना

निलकंठ विश्व फेज-१ को.ऑप.हौसिंग सोसायटीची चौथी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२५/०९/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता सोसायटीच्या आवारात खाली दिलेल्या विषयावर चर्चा व संमती देण्यासाठी घेण्यात येणार आहे.

**विषयपत्रिका**

१) दि.२७/०३/२०२२ रोजी झालेल्या तिसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचणे आणि मंजूर करणे.

२) लेखा परिक्षण सुधारणा अहवाल आणि त्यावरील समितीने केलेल्या कार्यवाहीसह ताळेबंद आणि उत्पन्न आणि खर्च विवरणे यांचा समावेश असलेल्या खात्यांचे लेखापरिक्षित विवरण मंजूर करणे आणि स्वीकारणे.

३) सन २०२२-२३ या वर्षासाठीचा प्रस्तावित अर्थसंकल्प दि.२७/०३/२०२२ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला व संलग्न आहे.

४) राज्य सरकारने मंजूर केलेल्या पॅनेलमधून सोसायटी खात्यांचे वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी बाह्य वैधानिक लेखापरिक्षक नियुक्त करणे.

५) पुर्वसुचेनची आवश्यकता नसताना, अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

टिप :-

१) सदस्यांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांच्या शंका असल्यास लिखीत स्वरुपात किंवा सोसायटीच्या इमेलवर (neelkanthvishwap1@gmail.com) नवीनतम १७ सप्टेंबर २०२२ पर्यंत प्रस्तुत करणे. ज्यामुळे त्यांच्या प्रश्नांच्या स्पष्टीकरणासाठी माहिती गोळा करणे सुलभ होईल.

२) केवळ सदस्यांना आणि त्यांच्या अनुपस्थितीत सह सदस्यांना सभेला उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाईल. या व्यतिरिक्त कोणताही प्रतिनिधी उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.१०/०९/२०२२

**सही/-**
**अध्यक्ष**
**निलकंठ विश्व फेज-१ को.ऑप.हौ.सो.लि.**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## फणसाड अभयारण्य व ग्रिन वर्क ट्रस्ट च्या वतीने गिधाड संवर्धन मोहीम

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यामधील फासाह अभयारण्य हे सुमारे ५४ चौरस किलोमीटर परिस्तरात विस्तार असलेले मोठे अभयारण्य आहे. विविध जातीचे पक्षी, वन्यजीव यांचा येथे मोठया प्रमाणात आधवास आहे. अंटार्टिका व ऑस्ट्रेलिया हे खंड वगळून गिधाडे सर्वत्र आढळतात. गिधाडे हि ताकदवर असतात रंगाने गडद किंवा काळा व करडा व पांढरा असतो. चोच बाकदार व टोकदार असते. बहुतेक गिधाडांच्या मानेवर पिसे नसतात दिवसा आकाशात उंचावरून घिरट्या मारुन ते आपले भक्ष्य शोधत असतात. मुरुड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात गिधाडांचे संवर्धन व त्यांची संख्या वाढण्यासाठी ग्रीन वर्क ट्रस्ट व फणसाड अभयारण्य माध्यमातून गिधाडांच्या आहार केंद्राची संकल्पना कार्यान्वित करण्यात आली आहे. सध्या गिधाडांच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. डिक्लोफेनॅक हे औषध जनावरांसाठी पुर्वी विपलले जायचे परंतु मृत जनावरांमध्ये हे औषध वापरल्याने त्याचा परिणाम गिधाडांच्या जिवावर झाला. त्यामुळे गिधाडांच्या संख्येत घट होऊ लागल्याने सरकारने या औषधाचा वापर करण्यावर बंदी घातली आहे.

संख्या कमी झालेल्या गिधाडांची संख्या वाढविणे व संरक्षण करण्या उदिष्टाने ग्रिन वर्क ट्रस्ट व फणसाड अभयारण्य यांच्या संयुक्त विद्यमाने गिधाड आहार केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. सन २०१५ पर्यंत फणसाड अभयारण्यातील गिधाडांची संख्या ३० ते ३५ होती. परंतु पुरेसा अन्न मिळत नसल्याने हे पक्षी स्थलांतरित झाले. सध्या ही गिधाडे म्हसळा व श्रीवर्धन परिसरात दिसत आहे. गेलेले गिधाडे फणसाड अभयारण्य परत यावीत याकरता फणसाड अभयारण्य प्रशासन व ग्रिन वर्क ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आहार केंद्राची स्थापना केली आहे. याकरिता लागणाऱ्या अन्नासाठी तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला पत्र पाठवून कळविले आहे. एखादा मृत जनावर आढळून आल्यास फणसाड अभयारण्य प्रशासनाला कळविण्याचे आवाहन केले आहे. अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोरे यांनी दिली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# एमएमआरडीएचे अधिकारी माथेरानच्या विकास कामांवर लक्ष कधी देणार?

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये सर्वाधिक निधी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रयत्नाने एमएमआरडीए च्या माध्यमातून १२३ कोटी रुपयांचा निधी येथील विविध विकास कामांसाठी प्राप्त झाला होता.परंतु हा निधी सुयोग्य पद्धतीने वापरला जात आहे की नाही,ठेकेदारांकडून कामे उत्तम दर्जाची होत आहेत की नाही याबाबत एमएमआरडीए च्या अधिकारी वर्गाला काहीएक सोयरसुतक नसल्याने मागील दोन वर्षांपासून सुरू असणारी विकास कामे अत्यंत निकृष्ट आणि तकलादू दिसत आहेत त्यामुळे स्थानिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



कधी नव्हे तो एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त झालेला असताना देखील होत असलेल्या कामांचा पुरता बोजवारा उडाला आहे. माथेरान मध्ये तांबडया मातीचे रस्ते धुळविरहित असावेत जेणेकरून पर्यावरणाला धोका निर्माण होणार नाही,पर्यटकांना पायी प्रवास करणे सुलभ होईल याकामी सनियंत्रण समितीने सुध्दा याठिकाणी क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांना मंजुरी दिली होती. दस्तुरी पासून पांडे रोड पर्यंतच्या मुख्य रस्त्यावर क्ले पेव्हर ब्लॉक बसविण्याची कामे जलदगतीने सुरू होती. ही सर्व कामे पूर्ण करताना संबंधीत ठेकेदाराने अथवा एमएमआरडीए च्या अधिकारी वर्गाने लक्ष केंद्रित न केल्यामुळे कामे अतिशय निकृष्ट दर्जाची झालेली या पावसाळ्यात दिसत आहेत. अमन लॉज रेल्वे स्टेशन जवळील काळोखी भागात चढावाच्या ठिकाणी रस्त्यांचा समतोल ढासळला असून पुढील या महिन्यातील पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे या रस्त्याला मोठाले चर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या ठेकेदाराने पावसाळी पाणी वाहून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारे नियोजन केलेले नाही त्यामुळे सर्व पाणी रस्त्यावरून जात आहे. परिणामी या पहिल्याच पावसात रस्त्याची दुर्दशा झा-लेली असल्याने त्यावरून पर्यटकांना प्रवास करणे अथवा आपले सामान खेचत नेणे खूपच जिकिरीचे बनलेले आहे. विशेष म्हणजे या सर्व कामांकडे नगरपरिषदेच्या सभागृहातील तत्कालीन सदस्यांनी तसेच एमएमआरडीए च्या अधिकारी वर्गाने हेतुपुरस्सर कानाडोळा केला आहे असे स्थानिकांमधून बोलले जात आहे.त्यामुळे निविदेप्रमाणे पाच वर्षे रस्त्याला काही तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची असल्याने त्यांनी ताबडतोब या रस्त्यांची दुरुस्ती करणे अनिवार्य असून पुढील पांडे रोड पर्यंतच्या रस्त्याची कामे पूर्ण करताना येथील जागरूक नागरिकांनी लक्ष केंद्रित करणे गरजेचे बनले आहे. जोपर्यंत कामे उत्तम दर्जाची आणि सुनियोजित केली जात नाहीत तोवर ठेकेदारांना बिले अदा करू नयेत असे जेष्ठ नागरिकांमधून बोलले जात आहे.

## कायदा व सुव्यवस्था राखून साखरचौथ गणेश उत्सव पार पाडा : गोविंद पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

कोरोना काळानंतर यंदा उत्सा-हात गणेशोत्सव पार पाडल्यानंतर पहिल्या संकष्टी चतुर्थीच्या दिवशी जोहे-दादर परिसरासह पेण तालुक्यात साजरा करण्यात येणारा साखरचौथ गणेशोत्सव कायदा व सुव्यवस्था राखून कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार न करता साजरा करण्यात यावा असे आवाहन दादर सागरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील यांनी केले.



सणासुदीच्या दिवसांत कायदा व सुव्यवस्था राखा, मिरवणुकीदरम्यान रस्त्यावर वाहतुकीस अडथळा येऊ देऊ नका, धार्मिक, राजकीय तेढ निर्माण होईल असे चलचित्र आणि मिरवणुकीत गाणी वाजऊ नका, आपल्या मिरवणुकीत आपलेच सदस्य सहभागी राहतील याची खबरदारी घ्या, पाण्याचा प्रवाह असेल तर खोल पाण्यात विसर्जन करण्यासाठी उतरू नका, मिरवणुकीची वेळ रात्री दहा वाजेपर्यंत राहील, आपल्या मागील मंडळाची मिरवणूक पुढे जाण्यासाठी मार्ग मोकळा करून द्या आदी प्रकारच्या महत्वाच्या सूचना गणेश मंडळाना तसेच सदस्स्यांना दादर सागरी पोलिसांमार्फत देण्यात आल्या. यावेळी सर्व मंडळांनी देखील नियमांचे पालन करत शांतता व सुव्यवस्था राखून आणि प्रशासनाने लादून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून आम्ही हा साखरचौथ गणेश उत्सव पार पाडू असे आश्वासन दिले.

## लंपी स्किन रोगाबाबत पशुपालकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे : डॉ.अनिल धांडे

**दै.रायगड नगरी । उरण**

सध्या घाटमाथ्यावरील पुणे, जळगाव, अहमद नगर, अकोला, धुळे या जिल्ह्यांमध्ये गोवंश व म्हैस वर्गातील जनावरांना लंपी स्किन या संसर्गजन्य त्वचा रोगाने ग्रासले आहे. त्यामुळे पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे उरण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील पशुपालकांनी सावधगिरी बाळगून सतर्क राहावे असे आवाहन उरण तालुका पशुधन विकास अधिकारी, डॉ. अनिल धांडे यांनी केले आहे.

लंपि स्किन हा त्वचारोग असून तो गोवंश व म्हैस वर्गातील जनावरांना होणारा भयंकर रोग आहे.या रोगाचा संसर्ग कॅंप्री पॉक्स या विषानुंपासून होतो. शेळ्या व मेंढ्यांमधील देवू रोगाशी हा विषाणू संबंधित आहे.चवणाऱ्या माशा, गोचीड, चिलटे बाधित जनावरांचा स्पर्श तसेच दूषित चारा पाण्यामुळे या रोगाचा प्रसार होतो.

या त्वचारोगात जनावरांच्या अंगावर १० ते २० मी मी व्यासाच्या गाठी येतात सुरुवातीला जनावरांना भरपूर ताप येतो. काही जनावरांच्या पायाला सूज येते. जाणवत लंगडते, नका तोंडातून चिकट स्त्रव येवून जनावर चारा खाणे बंद करते त्यामुळे जनावरांच्या दुग्धउत्पादनावर



त्याचा मोठा परिणाम होऊन शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. मात्र या रोगात जनावरांच्या मृत्यूचे प्रमाण अत्यल्प असते.

सध्या या त्वचारोगाचा प्रसार चार पाच जिल्ह्यात असला तरी त्याचा प्रसार आपल्या उरण परिसर व रायगड जिल्ह्यात होवू नये म्हणून पशुपालकांनी सतर्क राहिले पाहिजे असे पशुधन विकास अधिकारी अनिल धांडे यांनी सूची केले आहे.

जर पशुपालकांना या रोगाची लक्षणे दिसून आली तर आवश्यक काळजी घेणे गरजेचे आहे रोगाने बाधित जनावराला निरोगी जनावरांपासून वेगळे बंधने गोठ्यात औषधांची फवारणी करून चावऱ्या माशा, गोचीड, चिलटे यांचा बंदोबस्त करणे. असे विविध प्रकारे दक्षता घेणे आवश्यक आहे.

हा रोग जनावरांना आढळून आला तर घाबरून न जाता तालुका पशुसंवर्धन अधिकारी, डॉक्टर यांच्याशी संपर्क साधावा तसेच दुधाळ जनावरांच्या दुधावर त्याचा उरण तालुक्यात प्रभाव नाही. त्यामुळे घाबरून न जाता दुधाचा वापर करावा असेही डॉ अनिल धांडे यांनी शेवटी नमुद केले आहे.

## स्वच्छ सागर सुरक्षित सागर अभियानांतर्गत काशिद-बिच समुद्रकिनारी स्वच्छता मोहिम

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शासनाच्या स्वच्छ सागर सुरक्षित सागर अभियानांतर्गत मुरुड़ तहसील व काशिद ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने तहसीलदार रोहन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काशिद-बिच समुद्रकिनारी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

या स्वच्छता मोहिमेत तहसीलदार रोहन शिंदे, नायब तह-सीलदार रविंद्र सानप, महसूल नायब तहसीलदार गोविंद कोटंबे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी, नांदगाव मंडळ अधिकारी, तलाठी (नांदगाव),महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे सहाय्यक बंदर निरीक्षक महेश होले, यशोधन कुलकर्णी, काशिद ग्रामपंचायत सरपंच नम्रता कासार-खेडेकर, सदस्य संतोष राणे, ग्रामसेवक सुशांत ठाकूर, शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख तथा संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे तालुका अध्यक्ष भरत बेलोसे, सुनील दिवेकर, भिकेश दिवेकर, अमित खेडेकर, हेमंत चाळके, शरद बेलोसे, उमेश कासार, शैलेश खोत, पोलिस पाटील समृद्धी राणे, काशिद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, सुर्यकांत जंगम, प्रशांत खेडेकर कर्मचारी वृंद सहभागी झाले होते. यावेळी काशिद बीच समुद्रकिनाऱ्यावरील रिकाम्या प्लॅस्टिक बाटल्या,जाळी आदी.पाच टन कचरा गोळा करण्यात येऊन त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.



## भीक मागण्याच्या बहाण्याने चोरी करण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या दोन महिलांना पकडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर गावात भीक मागण्याच्या बहाण्याने चोरी करण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या महिला आणि तिच्या मुलीला स्थानिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

खारघर गावात भीक मागणाऱ्या महिलेने गावातील विश्वनाथ भगत यांच्या घरी आपल्या मुलीला चोरी करण्यासाठी पाठविले होते.

मुलीने मोबाईल व इतर साहित्य चोरी करून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला; विश्वनाथ भगत यांच्या पत्नीला हा प्रकार समजल्याने मुलीला रंगेहाथ पकडले.


**सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**दैनिक रायगड नगरी**
**9619979706 / 9619737911**


मा.गोडसे साहेब

**अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.२ रे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१३०६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२०/१०/२०२२

१) श्रीमती.पल्लवी प्रकाश जोशी, वय : ६६ वर्षे
२) सौ.श्रुती विनायक जोशी, वय : ४१ वर्षे
रा.फ्लॅट नं.०५२-०५०३, टॉवर-५२, सेक्टर क्र.११, हाडपसर, अमनोरा, टाऊनशिप, पुणे ४११०२८
३) कु.चैताली प्रकाश जोशी, वय : ३२ वर्षे
४) श्री.श्रेयश प्रकाश जोशी, वय : ३० वर्षे
क्र.१, ३, ४ रा.ए-६, साई रत्न, प्लॉट नं.११८, मिडल क्लास हौसिंग सोसायटी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.प्रकाश नारायण जोशी हे दि.२६/०४/२०२१ रोजी मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिडल क्लास को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड मधील प्लॉट नं.११८ या मिळकतीवर अस्तित्वात असलेल्या ''साई रत्न'' या इमारतीमधील फ्लॅट नं.६, पहिला मजला, ए-विंग, क्षेत्र ८४३.६३ चौ.फूट बिल्टअप अशा वर्णनाची सदनिका.**

अर्जदार हे कै.प्रकाश नारायण जोशी यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.१२/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**अर्जदारतर्फे वकील : अनंत देवजी पाटील**

### जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्याया.सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम नं.८७/२०२०
नि.नं.१५/ड
ने.ता.१५/०९/२०२२

मोहन राजाराम पवार वगैरे ४ — अर्जदार
विरुद्ध
१) जे थ्री लॉजिस्टीक
२) ICICI लोम्बार्ड जनरल इन्श्युरन्स कं.लि. — सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं.१ — १) जे थ्री लॉजिस्टीक, शॉप नं.०३, देवदृष्टी कॉम्प्लेक्स, नं.६२, फेज २, नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६

दि.१६/०३/२०२० रोजी रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास मौजे वडखळ गावचे पुढे कासू करंजटेप गावचे हद्दीत, करंजटेप गावचे फाट्यापासून उत्तरेस सुमारे ४५० मि. अंतरावर, मुंबई गोवा हायवेवर गोवा मुंबई लेनवर रस्त्याचे मध्यभागाचे डिव्हायडर पासून पश्चिमेस ९ फुटावर वडखळ पोलीस ठाणे, ता.पेण, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ व अर्जदार नं.२ यांचा मुलगा सुशांत मोहन भगत ह मयत झालेला आहे. सदर अपघातामध्ये ट्रेलर क्र.एमएच ४६/अेएफ/१६२९ वरील चालक हा सुशांत मोहन भगत यांच्या मरणास कारणीभत ठरले आहेत.

म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता रु.३०,००,०००/- चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.१५/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२९/०८/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक, जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग** — कोर्टाचा शिक्का — **सही/- अधिक्षक (न्याय विभाग), जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री.विठ्ठल महाद्या म्हात्रे यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देण्यात येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदी खत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत मुळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्यावर येवून खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट** :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका : उरण, मे.दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा : रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे : पिरकोन (पारंगीखार), येथील मिळकत भूमापन / सर्व्हे नं.१९२ हिस्सा ३/अ यांसी एकूण क्षेत्र ०० हेक्टर १६ आर ७० प्रति, व पोटखराबा ०० हेक्टर ०१ आर ०० प्रति, यांसी आकार रक्कम रुपये २.३१ पैसे, यांसी चतुःसिमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त.

रायगड, तारीख १२ सप्टेंबर २०२२

**सही/-**
**श्री.विनायक ताम्हणकर, वकील**
**खरेदीदारातर्फे वकील**
**पत्ता : ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र.८६६८५५१३१२**

मा.मुजावर साहेब कोर्ट

**अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१३०५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/१०/२०२२

१) श्रीमती.फुशीबाई उर्फ राधाबाई पद्माकर कोळी, वय : ६७ वर्षे,
२) श्री.गुरुनाथ पद्माकर कोळी, वय : ४६ वर्षे
३) सौ.संगीता हिरामण डोलकर, वय : ४५ वर्षे
४) श्री.बळीराम पद्माकर कोळी, वय : ४३ वर्षे
क्र.१ ते ४ रा.बेलपाडा, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.भारती वैभव बोंबट, वय : ३८ वर्षे
रा.रुम नं.१०१, पहिला मजला, ३५८ पाटील पाडा, खारदांडा, खार (प.), मुंबई ४०००५२ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.पद्या नथ्या कोळी उर्फ पद्माकर नथुराम कोळी हे दि.०४/०७/२०२२ रोजी मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| ओवळे-२९६ | ११५ | ५ | ०-०८-३ |
| | ११६ | ८ | ०-२३-५ |
| | १२९ | १० | ०-०३-० |

सदर मिळकतींचे संपादनाच्या मोबदल्यात खालील वर्णनाचा भूखंड वाटप झालेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| स्थळ | सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मीटर |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर-दापोली | ८ | १३४ ए | ५५० |

अर्जदार हे कै.पद्या नथ्या कोळी उर्फ पद्माकर नथुराम कोळी यंचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही. आज दि.१२/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## मोटार सायकलचा अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील रुपाली टॉकीज जवळून सिद्धांत मार्केट बिल्डिंग समोरून ६० हजार रुपये किमतीची मोटार सायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

हृतिक सोनकर यांची ६० हजार रुपये किमतीची पांढऱ्या भगव्या रंगाची एम एच ११ सी झेड ०४५५ ही तेथे विश्वासाने दिली असता सुमारे ३० वर्षीय वयाच्या एका इसमाने सदर मोटार सायकलचा अपहार केल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

## अनोळखी इसमाच्या नातेवाईकांचा शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

तालुक्यातील नांदगाव गावाच्या समोर टी पॉईंट ते पळस्पे कडे जाणाऱ्या रस्त्यावर ब्रिज जवळ एका ४० ते ४५ वयोगटातील इसमाचा मृतदेह आढळून आला असून रंग कला व सावळा, डोक्याचे केस अर्धवट टक्कल, साध-ारण वाढलेले कुरळे काळे, उंची ५.८ इंच, दाढी व मिशी वाढलेली असून, मयताच्या डाव्या हातावर अंगठ्याच्या वरील बाजूस रेणू असे इंग्रजी मध्ये लिहलेले आहे. तसेच डाव्या हाताच्या अंगठ्याच्या व बाजूच्या बोटाच्या मध्यभागी असलेल्या जागेमध्ये आडवे गोंधळले आहे. तर डाव्या हाताच्या मनगटा पासून कोपऱ्यात अनिल असे इंग्रजीमध्ये लिहलेले आहे. त्याच्या अंगात मेहंदी रंगाचा फुल टी-शर्ट व फिक्कट निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट घातलेली आहे. तसेच गळ्यामध्ये काळ्या व पांढऱ्या रंगाच्या चौकडी रेषा असलेलं रूमाल आहे.या इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे फोन नंबर - ०२२-२७४५२३३३ किंवा सहा. पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे यांच्याशी संपर्क साधावा

# माथेरानकरांची ई रिक्षाची प्रतीक्षा कधी संपणार? विद्यार्थी अजूनही करतायत पायपीट

**दै.रायगड नगरी । माथेरान**

ई रिक्षा बाबतीत चाचण्या होऊन देखील अद्यापही ही सेवा उपलब्ध न झाल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना चार ते पाच किलोमीटर पायपीट करावी लागत असल्याने पालक वर्गातून नाराजी दिसून येत आहे.

१२ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने माथेरानला पर्यावरण पूरक ई रिक्षा सुरू करण्याची परवानगी दिली या ऐतिहासिक निर्णयाचे गावाने मोठ्या उत्साहात स्वागत केले होते. हात रिक्षा चालकांनची हात रिक्षा ओढण्याच्या अमानवीय प्रथेतून मुक्ती मिळावी या साठी श्रमिक रिक्षा संघटना गेल्या दहा वर्षांपासून संघर्ष करीत आहेत.

ब्रिटिश काळा पासून येथे वाहनांना बंदी आहे २००३ साली सुप्रीम कोर्टाने माथेरानचा इको सेन्सेटिव्ह झोन मध्ये समावेश केला या कायद्यात देखील वाहनांना बंदी घातली फक्त रुग्णवाहिका व अग्निशमन गाडीस परवानगी दिली. या सर्व कायदेशीर बदला साठी संघटनेचे सचिव सुनिल शिंदे यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती दि १२ मे सुप्रीम कोर्टात सुनावणीच्या वेळी राज्य सरकार चे वकीलानी माथेरानचे रस्ते चढ उताराचे असल्याने तीन



महिने थोड्याप्रमानात रिक्षा सुरू करून कोणत्या कंपनीच्या रिक्षा सक्षमपणे चालू शकतात याचा अभ्यास करण्याची गरज असल्याचे सांगितले त्यानुसार कोर्टाने दि १२ मे रोजी तीन महिन्यांच्या पायलट प्रोजेक्ट घेण्याचे राज्य सरकार ला आदेश दिले त्यानुसार दि २७ जुलै रोजी एक दिवसाची चाचणी घेण्यात आली यात महिंद्रा कंपनीच्या दोन तर आयजॅक कंपनीची एक रिक्षा शक्तिशाली दिसून आल्या त्यामुळे नागरिक ई रिक्षा सुरू होण्याची मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहेत.

दोन दिवसांपूर्वीच येथील स्थानिक नागरिक अन्वर खान यांची प्रकृती अस्वस्थ झाली असता गावात रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने खाजगी वाहन गावात आणावे लागले होते या प्रकरणाची तिखट प्रतिक्रिया नागरिकांन मधून उमटल्या ई रिक्षा असती तर रुग्णास तात्काळ टॅक्सी स्टँड पर्यंत घेऊन जाता आले असते.

सेंट झेवीयर्स शाळा दीड महिन्याच्या पावसाळी सुट्टी नंतर सुरू झाली पालकांना मोठी आशा होती छोटी मुले रिक्षात बसून शाळेत जातील ई रिक्षाला परवानगी देताना विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक , महिला व दिव्यांग यांची पायपीट थांबावी हीच आहे रुग्णांना तात्काळ हॉस्पिटलमध्ये जात यावे त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशच तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी श्रमिक रिक्षा संघटना, ज्येष्ठ नागरिक संघटना , माथेरान व्यापारी संघटना व दिव्यांग संघटना यांनी पत्राद्वारे केली आहे.

# उरण नगरपरिषदने केली निर्माल्य पासून बायोगॅस निर्मिती आणि खत निर्मिती

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण परिषदेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश चतुर्थी ते अनंतचतुर्थी च्या काळात गणपती विसर्जन ठिकाणी गणपती विसर्जनासाठी भक्तांनी सोबत आणलेले निर्माल्य तलावात न टाकता निर्माल्य गोळा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती उरण नगरपरिषदेने विमला तलाव आणि भवरा तलाव येथील जमा झालेले निर्माल्य पासून बायोगॅस निर्मिती व खत निर्मिती केली आहे.

या कामी उरण नगरपरिषद नगराध्यक्षा सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, उरण तालुका भाजपा अध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, उरण शहर भाजपा अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, कनिष्ठ अभियंता झुंबर माने, सर्व



कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

जल, नैसर्गिक व मानवनिर्मित पाण्याचे त्रोताचे संवर्धन व सर्वेक्षण व्हावे, तलावातील पाण्याचे प्रदूषण होयू नये, उद्देश ठेवूनच निर्माल्य तलावात न टाकता ते स्वतंत्र व्यवस्था केलेल्या ठिकाणी टाकावे जेणे करून जमा केलेल्या निर्माल्य पासून बायो गॅस व खत निर्मिती केली जाईल अशी प्रतिक्रिया उरण नगरपरिषदेचे मुखाधिकारी संतोष माळी यांनी व्यक्त केली.

# सिमेंट बल्करची मोटर सायकलला धडक ; १ ठार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सायन पनवेल हायवेच्या पुरुषार्थ पेट्रोल पंप ब्रिज खाली तळोजा कडे जाणाऱ्या रस्त्याच्या कोपऱ्यावर सिमेंट बल्करने दुचाकीला धडक दिली. या धडकेत एकाचा मृत्यू झाला आहे.

या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृष्णा मुतगेकर असे मृत इसमाचे नाव आहे.

रोडपाली येथे राहणारे कृष्णा लक्ष्मण मुतगेकर हे मोटरसायकल क्रमांक एमएच ०६ एएच ६८५८ ने सायन पनवेल हायवेवरून कळंबोली रोडपाली येथे जात होते.

ते सायन पनवेल हायवेच्या पुरुषार्थ पेट्रोल पंप ब्रिजखाली तळोजाकडे जाणाऱ्या रोडच्या कोपऱ्यावर आले असता टाटा कंपनीच्या सिमेंट बल्कर क्र. एमएच १२ केपी ४६३८ वरील चालकाने त्यांच्या मोटरसायकलला धडक दिली. या धडकेत कृष्णा यांना गंभीर दुखापती झाल्या. त्यात त्यांचा मृत्यू झाला.

# पाली नगरपंचायत कार्यालयासमोर भरधाव डंपरने ३ गुरांना चिरडले

## चालक व डंपर पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली नगरपंचायत कार्यालयासमोर एका भरधाव डंपरने सोमवारी (ता.१२) पहाटे साडेपाच ते सहाच्या सुमारास दोन वासरे व एका गाईला चिरडल्याची घटना घडली आहे. यावेळी स्थानिकांच्या प्रसंगावधानामुळे लागलीच डंपर थांबवून चालक व डंपर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. संबंधित चालकाविरोधात किशोर खरीवले यांनी पाली पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली आहे.

डंपर चालक राजेंद्र कुमार माथो याच्या विरोधात पाली पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक






विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक श्री. पालकर हे करीत आहेत. या घटनेनंतर स्थानिकांनी पाली शहरातून होणाऱ्या बेदरकारपणे डंपर वाहतुकी विरोधात संताप व्यक्त केला. आज गुरे मरण पावली उद्या माणसे देखील या अशा प्रकारे दुर्घटनाग्रस्त होऊ शकतील त्यामुळे डंपर व अवजड वाहतुकीवर निर्बंध लावावेत अशी मागणी यावेळी नागरिकांनी केली.

# आंबेनळी घाटात इनोव्हा-पिकअप जीपचा अपघात ; १ गंभीर

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर मार्गावरील आंबेनळी घाटात रविवारी सायंकाळी इनोव्हा आणि पिकअप जीपचा समोरासमोर अपघात होऊन पिकअपचालक गंभीर जखमी झाला.

आंबेनळी घाटामध्ये रविवारी सायंकाळी पावणेचार वाजण्याच्या सुमारास पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर मार्गावर पोलादपूरपासून १९ कि.मी. अंतरावर मुंबईतील चारकोप कांदिवली पश्चिम येथील गणेश बालाजी कांबळे (वय ३३ वर्षे) हे त्यांच्या ताब्यातील इनोव्हा कार (क्र. एमएच ०२ सीएच ६४६५) घेऊन पोलादपूरच्या दिशेने येत असताना पोल-ादपूर तालुक्यातील आंबेमाची गावानजिक पोलादपूर बाजूकडून कोंबड्यांची वाहतूक करणारी पिकअपजीप (क्र.एमएच ११ एजी ४२०२) घेऊन पोलादपूर तालुक्यातील






क्षेत्रपाळ येथील विठ्ठल दिनकर भिलारे (वय ५३ वर्षे) हे महाबळेश्वरकडे चालले असताना या दोन्ही वाहनांमध्ये समोरासमोर टक्कर होऊन अपघात झाला. या अपघा-तात विठ्ठल भिलारे यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली. अपघाताची खबर इनोव्हा चालक गणेश कांबळे यांनी दिल्यानुसार तातडीने पोलादपूर पोलीस ठाण्याचे हवा-लदार संदीप शिरगांवकर हे सहायक पोलीस निरिक्षक म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली अपघात स्थळी तातडीने रवाना झाले. अपघातातील जखमीवर पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये उपचार करण्यात आले. या अपघात प्रकरणी १२-२०२२ नुसार पोलादपूर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार शिरगांवकर अधिक तपास करीत आहेत.

# म्हसळ्यात पर्यावरण पूरक गणपती आरास स्पर्धेतील उदय कळस यांचे सजावटीस प्रथम क्रमांक



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

या वर्षीच्या गणेश गौरी उत्सावानिमित्त म्हसळा शहरातील गणेश गौरी सजावटी करिता नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध पक्ष आणि म्हसळा नगरपंचायत यांच्या माध्यमातून पर्यावरण पूरक स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठान, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि म्हसळा नगरपंचायत यांच्या माध्यमातून स्पर्धेत भाग घेण्याचे आवाहन करण्यात आले होते.

शहरातील गणेश भक्तांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन स्पर्धा यशस्वी केल्या. उदयकुमार कळस यांचे निवासस्थानी विराजमान गणेश आरास मध्ये जागृती समीर दिवेकर, समीर दिवेकर, सुशील दिवेकर, रोहित डोंगरे, अनिकेत येलवे आणि मित्रमंडळ यांच्या माध्यमातून बांबू, नारळाचे झाप आणि निसर्गातील नैसर्गिक वस्तूंचा वापर करून पूर्णपणे १०० टक्के पर्यावरण पूरक झोपडी सोबत निर्मल्य कलशाच्या आधारे खत निर्मिती असा अप्रतिम देखावा सादर केला.

या देखाव्यास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठान कडून प्रथम क्रमांक रु.५०००/- रोख आणि आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मानीत करण्यात आले. द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक अविनाश वसंत बोरकर यांना रोख रु.३०००/- आणि आकर्षक ट्रॉफी, तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक सदानंद काते यांना रोख रु.२०००/- आणि आकर्षक ट्रॉफी त्याच प्रमाणे यशवंत पवार, रमेश खताते, प्रमोद काते यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देवुन सन्मानीत करण्यात आले तर गौरी सजावट स्पर्धेत गणेश खांडेकर यांचा प्रथम क्रमांक त्यांना ३ हजार रुपये व ट्रॉफी, रोहन घोसाळकर यांचा द्वितीय क्रमांक २ हजार रुपये व ट्रॉफी, सौरव पोतदार यांना तृतीय क्रमांक १ हजार रुपये व ट्रॉफी, अभय ठसाळ यांना गौरी आरास स्पर्धेचे उत्तेजनार्थ १ हजार रुपये व ट्रॉफी असे बक्षिस प्राप्त केले आहेत.

स्पर्धेच्या नियमावली नुसार गौरी गणपती सजावट स्पर्धेतील विजेत्यांना तालुका अध्यक्ष समीर बनकर, उपनगराध्यक्ष सुनिल शेडगे, गटनेते संजय कर्णिक, नगरसेवक संजय दिवेकर,भाई बोरकर, महीला शहर अध्यक्षा शगुप्ता जहांगीर, चंद्रकांत कापरे, मंगेश म्हशिलकर, प्रदिप कदम यांचे हस्ते रोख बक्षीस व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानीत करण्यात आले. विजेत्यांचे खासदार सुनिल तटकरे, माजी पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरेसह तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यानी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईने ४१ वर्षे वयाच्या महिलेला तब्येतीच्या अडचणींचा सामना करत आई बनण्याचे स्वप्न केले पूर्ण

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

बाळाबद्दल आईचे प्रेम त्या क्षणापासून सुरु होते जेव्हा ती आपल्या नुकत्याच जन्मलेल्या बाळाला पहिल्यांदा स्वतःच्या हातात घेते. नवी मुंबईमध्ये राहणाऱ्या ४९ वर्षांच्या एका महिलेसाठी आई होण्याचे स्वप्न अर्धवट राहिले होते, दोन वेळा गर्भपात आणि गर्भधारणा होण्यात येणाऱ्या अडचणी यामुळे त्या खूपच त्रासल्या होत्या. शेवटी हे पतिपत्नी एका प्रायव्हेट क्लिनिकमध्ये आयव्हीएफ (इन-विट्रो फर्टिलायझेशन) साठी गेले आणि दुसऱ्या प्रयत्नांत यशस्वी गर्भधारणा झाली. पण या महिलेच्या आरोग्यामध्ये बरीच गुंतागुंत झाली आणि त्यांना कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल (केडीएएच) नवी मुंबई येथे जाण्याचा सल्ला दिला गेला. याठिकाणी कन्सल्टन्ट स्त्रीरोग तज्ञ आणि प्रसूती तज्ञ डॉ. बंदिता सिन्हा यांच्या नेतृत्वाखाली एका टीमने आत्यंतिक गंभीर गरोदरपणात त्यांची खूप चांगली काळजी घेतली.

या महिलेला दीर्घकालीन हायपरटेन्शन व हायपोथायरॉइडिजम पहिल्यापासून असल्याचे लक्षात आले. आधी गर्भपात झालेले होते त्यामुळे तज्ञ डॉक्टरांच्या टीमकडून प्रगत देखभाल सेवासुविधा पुरवल्या जाणे गरजेचे होते. डॉक्टरांनी पुरवलेली काळजी आणि मदत यामुळे गरोदरपणात ३४व्या आठवड्यात या महिलेने एका निरोगी मुलीला जन्म देण्यात यश मिळवले. पण प्रसूतीनंतर तिच्या तब्येतीमध्ये बरीच गुंतागुंत झाली, खूप जास्त रक्तस्त्राव झाला. अतिशय गंभीर अवस्थेमध्ये त्यांना आयसीयूमध्ये हलवण्यात आले. स्वादुपिंडाला आ-लेली सूज आणि फुफ्फुसांमध्ये द्रव साठल्याने महिला शॉकमध्ये गेली होती. वेगवेगळ्या स्पेशालिटीजच्या डॉक्टरांचा समावेश असलेल्या एका टीमने १० दिवसांतून जास्त काळ अहोरात्र मेहनत घेऊन एका नवजात बाळाच्या आईला मृत्यूच्या दाढेत जाण्यापासून वाचवले. आज ही महिला आपले बाळ व कुटुंबासह मातृत्वाचा अनमोल आनंद उपभोगत आहे.

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबई येथील कन्सल्टन्ट स्त्रीरोग तज्ञ आणि प्रसूती तज्ञ डॉ. बंदिता सिन्हा म्हणाल्या, या महिलेचे वय आणि आधी उद्भवलेल्या वैद्यकीय समस्या पाहता गरोदरपण आणि प्रसूती या दोन्ही गोष्टींमध्ये खूप जास्त जोखीम होती. गरोदरपणात आम्ही त्यांची संपूर्ण काळजी घेतली. त्यांच्या दुसऱ्या गर्भपातामध्ये पाचव्या महिन्यात बाळाची वाढ होणे थांबले होते, म्हणून यावेळी बाळाची वाढ नीट होत आहे हे पाहण्यासाठी दर १५ दिवसांनी सोनोग्राफी केली जात होती. त्यामुळे त्यांनी एका निरोगी बाळाला जन्म दिला. टर्शरी केयर हॉस्पिटल असल्याने प्रसूतीनंतरची गुंतागुंत दूर करण्यासाठी आम्ही पूर्णपणे सज्ज होतो, त्यामुळे मौल्यवान वेळ वाचला. सर्व स्पेशालिटीजच्या तज्ञ डॉक्टरांची टीम उपलब्ध असल्याने आईचा जीव वाचवला गेला आणि त्या बऱ्या होऊ शकल्या.

# खांदेश्वर पोलीस स्टेशनच्या गणपतीचे विसर्जन मोठ्या उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकमान्य टिळकाने सर्व लोक एकत्र यावे या करिता गणेश उत्सव सुरु केला हाच आदर्श घेऊन खान्देश्वर पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे यांच्या मार्गदर्शना खाली गणेशाची खांदेश्वर पोलीस स्टेशन मध्ये स्थापना करण्यात आली होती सतत जनतेच्या सुरक्षितेसाठी पोलीस बांधव दिवस रात्र कर्तव्य निभावत असतात.

गणेशाची स्थापना केल्यामुळे सर्व पोलीस बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. नुकतीच खांदेश्वर पो-लीस स्टेशन मधील गणेशाचे विसर्जनाची मिरवणूक काढण्यात आली होती, मिरवणुकीमध्ये सुद्धा गुन्हेगारा संबंधित जनतेमध्ये जनजागृती करण्यात आली.

गर्दीच्या ठिकाणी सुरक्षिता कशी



बाळगावी, गुन्हेगारांपासून सावध कसे राहावे, चोरीचा घटना कशा टाळण्यात येतील अशा अनेक बाबी या माध्यमातून जनतेमध्ये जनजागृती करण्यात आली. सर्व वरिष्ठ अधिकारी पोलीस बांधवानी मोठ्या उत्साहात गणपती बाप्पांना निरोप दिला,

सर्व गणेश भक्तानी मिरवणूक काढताना आनंदीमय वातावरणात सुरक्षित कशी करता येईल ही नेहमी काळजी घ्यावी असे मत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोकाटे यांनी व्यक्त केले मिरवणूक दरम्यान क्राईम ब्रँच वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील तसेच पोलिस स्टेशनचे पोलीस बांधव पत्रकार बंधू शांतता कमिटी मधील पदाधिकारी उपस्थिती होते.

# गळफास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील सिमरन मोटरच्या पाठीमागे असलेल्या कातकरवाडीत एका वीस वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १० सप्टेंबर रोजी रात्री घडली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अक्षय अनंत कातकरी याने अज्ञात कारणावरून बदामाच्या झाडाला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेतला. पनवेल पोलीस अधिक तपास करत आहेत.